'Research Journey' International Multidisciplinary E- Research Journal
Vol. 1 Issue. 3
ISSN : 2348-7143 (Online)
July-Sept.-2014

# सातपुड्यातील आदिवासी तडवी भिल्लांची समाजव्यवस्था
## (बारकरी पंचायत परंपरा : एक शोध)

- अजीज रशीद तडवी
तडवी बोली अभ्यासक व लेखक
जळगाव, महाराष्ट्र, भारत.
Email - tadviajij@gmail.com
मो. ९९२३२९३९८५

*खान्देशात बारकरी ही आदिवासी तडवी जमातीची समाजमान्य पारंपरिक न्यायव्यवस्था होती. साधारणपणे बारा ते पंधरा गावांचा एक गट अशी विभागणी करुन या गावांच्या सुव्यवस्थेची जबाबदारी असणाऱ्या पंचमंडळास बारकरी असे म्हटले जाई. या बारकरी मंडळाच्या प्रमुखाची निवड भिल्ल राजांकडून केली जाई. कौटुंबिक, सामाजिक, आर्थिक अशा सर्वच प्रकारच्या वादांची सुनावणी या बारकरी मंडळाकडून केली जाई. आजच्या न्यायव्यवस्थेइतकी सक्षम नसली तरी कडक कायदे आणि त्या कायद्यांच्या पालनाची आदिवासींची नैतिकता उच्च क्षमतेची असल्यामुळे आजच्या अराजकतेकडे झ ेपावणाऱ्या समाजाला आणि न्यायव्यवस्थेलाही दिशादर्शन करण्याची क्षमता या बारकरी समाजपरंपरेत असल्याचे आपणांस दिसते.*

सातपुड्यात अनेक आदिवासी जमाती वास्तव्यास आहेत. त्यात भिल्ल, तडवी, पावरी या जमातीचा समावेश होतो. या आदिमांची एक वैशिष्टयपूर्ण समाज परंपरा दिसून येते. एक प्राचीन लढवय्यी जमात म्हणून तडवी या जमातीचा उल्लेख इतिहासात आहे. तडवी हे मूळतः भिल्लाचे वंशज आहेत. तडवींबद्दल अभ्यासकांना थोडेफार माहिती आहे. काही सामाजिक रुढी, परंपरा, चालीरीती व सांस्कृतिक वैशिष्टयपूर्ण पद्धतीने ते कसे जगतात या बाबतीत अजुनही लोक संभ्रमात दिसतात. तडवींबद्दल संशोधन हे अत्यंत माफक स्वरुपात उपलब्ध आहे. मात्र आता त्यास गती देण्याचे काम नव्या अभ्यासकांनी करायला हवे. तडवींच्या अनेक प्राचीन सभ्यतापूर्ण चालीरीती व प्राचीन परंपरा ह्या काळाच्या पडद्याआड गेल्या आहेत. त्या लुप्त झालेल्या आहेत. निदान आता तरी त्यांची महिती ही संकलीत करून तसेच लिपिबद्ध करुन शासनास उपलब्ध करुन दिल्यास हे एक आदिमांबद्दल फार मोठे मौलिक काम होईल यात शंका नाही.

आदिवासी लोकपरंपरा, लोकमत या गोष्टी समाजाच्या न्यायदानाचा आधार आहे. त्या भागातील नैसर्गिक साधनसामुग्रीचा ते आपल्या जीवनात उपयोग करतात. आदिवासी ज्या भू-भागात राहतात त्या भू-भागाबद्दल त्यांच्या मनात अतीव आत्मीयता असते. यामुळे त्यांच्यात संघभावना दिसून येते. या संघ भावनेत जर संघर्ष करणारी स्थिती काही मनुष्य स्वभावाने निर्माण झाली तर त्यावर नियंत्रण

ठेवण्याकरीता आदिमांनी नियमन तथा नियंत्रण संस्था निर्माण केली. आदिवासींमध्ये जातपंचायत ही सर्वमान्य तथा सार्वभौम सत्ता म्हणून ओळखली जाते. त्या जातपंचयतीमध्ये घेतलेले सर्व निर्णय हे बंधनकारक असतात. या निर्णयावर आदिवासींची दृढ श्रद्धा असते. ही पंचायत आदिवासीची पारस्पारिक व्यवहार तथा समाजातील चलनावर नियंत्रण ठेवणारी समाज व्यवस्था असून ती प्राचीन काळापासून पीढी दर पीढी चालत आलेली आहे. असे विद्वानांचे मत आहे. अशीच एक जातपंचायत आदर्श न्यायव्यवस्था बारकरी परंपरा म्हणून प्राचीन काळापासून आदिवासी तडवी भिल्ल समाजात होती.

आज २१ व्या शतकात भारत सरकारकडून तंटामुक्तीसाईच्या धोरणात्मक योजना राबवल्या जात आहेत. सदरची ही तंटामुक्तीचे धोरणात्मक योजना ही सातपुड्यातील आदिवासी तडवी भिल्ल जमातीने शेकडो वर्षांपूर्वीच सुरु करुन समाजव्यवस्था निकोप व सबळ करण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. न्यायवृत्तीने, डोळस बुद्धीने सकारात्मक दृष्टीकोन ठेवून आपल्या समाजात तंटामुक्तीचे समाजधोरण अगदी आदिम काळापासून राबवले जात होते. सदरची ही प्रचीन परंपरा समाजात बारकरी परंपरा म्हणून आदिम - तडवी भिल्ल समाजात प्रचलीत होती. आज जरी सदरची परपंरा लुप्त झालेली असली तरी तिचे महत्त्व आजच्या २१ व्या शतकात देखील पूर्वीसारखेच आहे.

**कारण मीमांसा**

१. इ स.पू.४००० वर्षे पाषाण युगापासून भिल्लांचे उल्लेख आढळतात. याच भिल्ल संस्कृतीतून उपजून पुढे स्वतंत्र अस्तित्व निर्माण करत तडवी ही भिल्ल सरदाराचा गट, समुह किंवा कबिला हा स्वतंत्र होऊन वेगळी सांस्कृतिक ओळख तडवींनी निर्माण केली मात्र त्यानी मूळ भिल्ल संस्कृतीचे संस्कार, रुढी परंपरा चालीरीतींचा त्याग केलेला नाही. आपल्या समाजाचा जीवनव्यवहार व समाजरित आपल्या जनतेने व्यवस्थित पाळावी म्हणून तडवी राजे व वतनदार यांनी सर्व प्रथम बार्करी परंपरेची सुरुवात केली.

२. तडवी राजे वतनदार यांनी समाजामध्ये सगळ्यांना योग्य तो न्याय मिळावा, न्यायदानाची प्रक्रिया व्यवस्थित चालावी, कोणावरही अत्याचार, दुराचार होणार नाही याची विशेष काळजी घेतलेली दिसते. विशेष करुन महिलांना योग्य न्याय देण्यात यावा व तिला काही प्रमाणात मान व स्वातंत्र्य मिळावे या हेतूने नियम करवून त्याची व्यवस्थित अंमलबजावणी करता यावी यासाठी बारकरी परंपरा स्थापीत झाली.

३. तडवी समाजामधील तंटे, बखेडे सोडविणे, हक्काची पायमल्ली होणार नाही याकरीता काळजी घेणे तसेच सर्वांना समान न्याय या तत्त्वासाठी बारकरी पंचमंडळ निर्णय घेऊन योग्य तो न्यायदानाचा निर्णय घेत असे. त्याचे पालन हे जनतेने केलेच पाहीजे अशी सक्ती बारकरी परंपरेत असे.

४. घटस्फोट, फारकत, पती पत्नीचे भांडण, समाजातील लोकांच्या एकमेकांविरुद्धच्या तक्रारी यांचे निवारण करणारी समाज पंचायत म्हणजेच बारकरी परंपरा होय. या बारकरी परंपरेतून गावातील तंटामुक्तीचे धोरण राबवले जात असे.

५. बारकरी हा बारा गावांचा न्यायनिवाडा करणारा प्रमुख न्यायाधिश असे. समाज प्रमुख, सरपंच असे. बारकरीची निवड तडवी राजे, वतनदार यांचेकडून केली जाई. त्याने दिलेला निर्णय हा शिरोधार्य मानण्यात येई व त्याचे पालन सर्व तडवी आदिवासी जनतेला करावे लागत असे.

६. बारकरीच्या उदरनिर्वाहासाठी, त्यांनी केलेल्या न्यायदानाच्या समाजसेवेबद्दल १२ गावातील आदिवासी लोक धान्य, पशु-पक्षी धन, तसेच बारकरी पंचमंडळाची शेती सामाजिक श्रमदानाने कसून देणे, नांगरुन देणे आदि स्वरूपात बारकरीला मोबदला मिळत असे.

७. तडवी समाज हा सातपुड्याच्या पायथ्याशी (चोपडा, यावल व रावेर) मुख्यत: वस्तीस आहे. चोपड्यापासून ते असिरगड पावेतो सातपुड्याच्या परिसरातील तडवी वस्ती असलेल्या गावाची नऊ विभागात वाटणी झाली आहे. अशी सुमारे १५० च्या आसपास गावे आहेत. एका गटाला बाऱ्हे ही विशिष्ट संज्ञा आहे. अशी नऊ बाऱ्हे आहेत. बाऱ्हेच्या प्रमुखास बारकरी म्हणून संबोधण्यात येई. बाऱ्हाचे एक ठरावीक मुख्य गाव असे. त्याच्या ताब्यात १२ ते १५ गावे असत.

८. खान्देशात प्राचिनकाळी तीा ठीकाणी अत्यंत प्रतिष्ठीत असे न्यायालय अर्थात बारकरी सामाजिक पंचायत मंडळ होते. उदा.

१. आभोडा, ता. रावेर जि. जळगाव

२. आडगांव कसारखेडा ता. यावल जि. जळगाव

३. अडावद ता. चोपडा जि. जळगाव

सर्वात मानाचे बाऱ्हे हे यावल तालुक्यातील आडगाव येथील मानले जाई. त्याला मोठा बारकरी म्हणत.

९. सदरची ही प्राचीन परंपरा काळाच्या पडद्याआड गेलेली आहे. लुप्त झालेली आहे. परंतु आता पाडया-वाडयातून व गावांगावांतून ग्रामपंचायत व समाजपंचायत स्थापन झाल्यामुळे ही प्राचीन बारकरी परंपरा जवळजवळ संपल्यागत आहे.

**निष्कर्ष ......**

१) प्रत्येक आदिवासी जमाती मध्ये एक जातपंचायत असते. त्याची मदत घेऊन आदिवासी आपल्या लहान मोठे झगडे, तंटे तथा गुन्हा समस्या यांचे बाबत न्याय मिळणे करता पंचायतीत जातात. आदिवासी आपल्या जात पंचायतीत पूर्ण विश्वास व श्रद्धा असते.

२) परंपरेनुसार रुढी, नियम विधी तथा समाजाने निश्चित केलेले अलिखीत कायदे, यांचे पालन हे लोक करतात, याची सर्व खबरदारी ही समाज पंचायत जात पंचायत घेत असे.

३) आजच्या २१ व्या शतकात समाजात भ्रष्टाचार, स्वार्थीवृत्ती अनैतिकता हे दुर्गुण दिसतात परंतु या आदिवासी जमातीत हे दुर्गूण दिसून येत नाहीत. त्यामुळे डोंगर पहाड पट्टीत राहणारे अज्ञान व शिक्षणापासून दूर राहूनही ते सफलतापूर्वक जीवन जगतात या सर्व गोष्टीचा विचार केला तर आजचा सुशिक्षित समाज व सुसंस्कृत आहे की आदिवासी सुसंस्कृत आहेत. याचा विचार अंतर्मुख होवून करण्याची पाळी आजच्या सभ्य मानव समाजावर आली आहे.

४) आदिवासी जीवनसरणीत बलात्कार, स्त्रीभृण हत्त्या, व्यभिचार, अहंकार, असमानतावादी वृत्ती, बुजुर्ग व महिलांचा अनादर हसेईल असे कृत्य, अवमान्यता या गोष्टी आढळून येत नाहीत. एकंद्ररीत बारकरी परंपरेसारखी मौलिक समाजव्यवस्थेचे महत्त्व आजच्या २१ व्या शतकात फार मोठ्या प्रमाणात जाणवते यात शंका नाही.

**संदर्भ ग्रंथ :-**

१. अजिज रशीद तडवी - जत्रा.
२. अजिज रशीद तडवी - तडवी बोली शब्दकोश